# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. विशेष स्थायी समिती सभा दि. १४/०६/२०२२

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा मंगळवार १४/०६/२०२२ रोजी सभा सुचना क्र. ३ दि. १३/०६/२०२२ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात दुपारी ३.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. राकेश शाह हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. राकेश रतिशचंद्र शाह | सभापती |
| २. | श्रीम. शानु जोरावर गोहिल | सदस्या |
| ३. | श्रीम. सुनिता रमेश जैन | सदस्या |
| ४. | श्री. सुरेश खंडेलवाल | सदस्य |
| ५. | श्री. आनंद द. मांजरेकर | सदस्य |
| ६. | श्री. मनोज रा. दुबे | सदस्य |
| ७. | श्रीम. सिमा क. शाह | सदस्या |
| ८. | श्री. जयेश भानुदास भोईर | सदस्य |
| ९. | श्री. जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| १०. | श्रीम. कुसुम सं. गुप्ता | सदस्या |
| ११. | श्रीम. मर्लिन म. डिसा | सदस्या |
| १२. | श्री. अशरफ मो. शेख | सदस्य |

**गैरहजर सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| २. | श्रीम. सुजाता य. पारधी | सदस्या |
| ३. | श्रीम. शर्मिला बगाजी | सदस्या |
| ४. | श्रीम. अर्चना अ. कदम | सदस्या |

नगरसचिव :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा मंगळवार दि. १४/०६/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०३ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.प्रकरण क्र. 41, मनपा क्षेत्रात पावसाळ्या दरम्यान सखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा कामी भाड्याने 10 BHP ते 19 BHP HP क्षमतेचे सक्शन पंप पुरवठा कामाच्या निविदेतील दरास मंजुरी मिळणेबाबत.

शानु गोहिल :-

निविदेतील प्राप्त दरामध्ये वाटाघाटी अंती मान्य केलेल्या दराचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Type of Suction Pump | मे. गणेश डेव्हलपर्स यांनी सादर केलेले दर | मे. विंध्या ट्रेडर्स यांनी सादर केलेले दर | मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी सादर केलेले दर | L1 निविदाधारक मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Dewatering on BHP by using water pump including diversion of stream, providing cofferdams, earthern bunds etc. as may be necessary for foundation and other parts of the works and pumping out water during and after excavation as may be required by using 10 to 19 BHP pump etc. complete. | Rs. 410.00 Per Hour | Rs. 504.00 Per Hour | **Rs. 345.00 Per Hour** | **Rs. 340.00 Per Hour** |
| 2 | Providing Labour including required safety precaution | Rs. 165.00 Per Hour | Rs. 175.00 Per Hour | **Rs. 150.00 Per Hour** | **Rs. 140.00 Per Hour** |
| | **Total** | **Rs. 575.00 Per Hour** | **Rs. 679.00 Per Hour** | **Rs. 495.00 Per Hour** | **Rs. 480.00 Per Hour** |

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार पावसाळ्या दरम्यान सखल /अतिसखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी 10 BHP ते 19 BHP क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने पुरवठा करणे कामी मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांची वाटाघाटी अंती मान्य केलेल्या दराची निविदा स्विकारून रू. 75 लाख पर्यंतच्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सुनिता जैन :-

माझे अनुमोदन आहे.

जयेश भोईर :-

मा. सभापती महोदय आमचे राई, मुर्धा, मोर्वा हा गाव खाली आहेत तिथे इंजिन लावतो त्यावेळी तिथे ऑपरेटर नसतो. तर तो ऑपरेटर महापालिकेचा असतो की ठेकेदाराचा ऑपरेटर असतो. मेन रोडला एम.एम.आर.डी.ए. चे काम घेतले आहे तिकडे अर्धवट काम राहिले आहे. तिथला पाणी निचरा करण्यासाठी पंपची आवश्यकता नसते. पण ते पर्यायी बांधकाम विभागाने लवकरात लवकर करावे. सखोल भाग भरपूर असताना इंजिन एकच असते ते इथून तिथे फिरवतात त्यात वेळ निघून जातो त्यामुळे छोटे पंप लावले तर चांगले होईल.

मर्लिन डिसा :-

गेल्या आठवड्यात पहिला पाऊस पडला आणि संध्याकाळी फोन यायला सुरुवात झाली. शितलनगर एकदम लो लाईन एरिया आहे. दरवर्षी लोकांच्या घरात पाणी शिरते आणि त्यादिवशी पण 76 वर्षाची जेष्ठ नागरिक मला फोन करून रडायला लागली अर्ध्या तासाच्या पावसात तिकडे पाणी साचले होते दुसऱ्या दिवशी रवि पवार साहेब तिकडे आले होते. दुसऱ्या गल्लीत झाकण उघडून पाहिले तर त्याच्यात भरपूर कचरा होता. त्याच्यात प्लास्टीक, काचेच्या बाटल्या, दारुच्या बाटल्या त्यामध्ये सर्व होते. माझी रिक्वेस्ट आहे प्रत्येक आठवड्यात ते गटार साफ करून घ्या. साफसफाई रेग्युलर झाली तर एवढे

प्रॉब्लेम येणार नाही. रात्री पाऊस आला तर त्यांना झोपायला होत नाही. लोकांना एवढा त्रास होतो तर तुम्ही काहीतरी निवारण करा.

सुरेश खंडेलवाल :-

मा. सभापती महोदय नालेसफाई होते ते आजपर्यंत गटार सफाईचे काम चालूच आहे. माझ्या 15 वर्षाच्या अनुभवात मी पहिल्यांदा बघितले आहे की आमच्या फाटक रोडला अजून गटार सफाई चालू आहे. ह्या वर्षी अजून गटार सफाई पूर्ण का झाली नाही हा माझा प्रश्न आहे. पानपट्टे साहेब तुम्ही काय बोलले आम्ही तुम्हाला एवढे कोटी बजेटमध्ये मागितले आणि तुम्ही एवढे कोटी मंजूर केले. स्टॅन्डींगमध्ये प्रपोजल तुम्ही देता तुम्ही दोन कोटीचे प्रपोजल दिले आम्ही ते मंजूर केले आपली 1500 कोटीची महापालिका आहे. नालेसफाई वेळेवर होत नाही. सोसायटीमध्ये पाणी साचते अजून पाऊस चालू झाला नाही तरी ही परिस्थिती आहे. तुम्हाला आम्ही बजेटमध्ये दिले नाही तर तुम्ही सांगा आम्ही देऊ पैसे शहरासाठी खर्च करता. तुमच्याकडे अजून लेबर नाही.

आनंद मांजरेकर :-

आमच्याकडे कॉम्पलेक्समध्ये पाणी भरते तेव्हा आम्ही तुम्हाला सांगतो पंप लावा आणि तुम्ही पंप लावता परंतु प्रॉब्लेम असा होतो की जेव्हा पाणी भरते तेव्हा पहिला फोन नगरसेवकांना जातो मग ते रात्री 2 किंव 3 कधीही आम्ही जेव्हा कॉन्ट्रॅक्टरला फोन करतो तेव्हा तो कॉन्ट्रॅक्टर एक ते दीढ तास तिथे पोहोचत नाही आणि लोकांची मानसिकता असते की पंप लागला म्हणजे पाणी कमी होईल. कधी ऑरेटर पोहोचतो तर त्याच्याकडे डिझेल नसते. तुम्ही कॉन्ट्रॅक्टरला बोलवून सांगा आज तो इथे पाहिजे होता त्याला ऑपरेटर जास्त ठेवायला सांगा कारण शांतीनगर कुठे आणि काशिमिरा कुठे एक ऑपरेटर काम करतो त्यामुळे कॉन्ट्रॅक्टरला ऑपरेटर जास्त ठेवायला सांगा.

शानू गोहिल :-

करारनाम्यामध्ये तसा क्लॉज मेन्शन करा.

मनोज दुबे :-

शांती विहार रेल्वे समांतर नाला आधा नाला साफ करके वो कचरा उधर ही रख दिया वो कचरा नाले में फैल गया|

सुरेश खंडेलवाल :-

जो गटारामधून कचरा काढला होता तो पण 10-15 दिवस रस्त्यावर पडलेला होता. आपली जी कॉन्ट्र्याक्टरची माणस गटार साफ करतात तर आपण 3-4 कोटीची आपण जे नालेसफाईसाठी देतो ते कशासाठी देतो. पंप किती ही लावले तरी शहरामध्ये काही होणार नाही.

मर्लिन डिसा :-

प्रत्येक नगरसेवक कोणत्या कॉन्ट्रॅक्टरला भेटायचं त्याचा कॉन्टॅक्ट नंबर द्या.

कुसुम गुप्ता :-

प्रभाग क्र. 4 में तलाव रोड में उधर का हर साल का प्रॉब्लेम है| उधर हर साल पंप मंगाया जाता है| हर साल कहाँ प्रॉब्लेम आती है वो आपको पता है, तो हर बार क्यों बोलना पडता है|

सुरेश खंडेलवाल :-

मेन रोडचा मोठा नाला साफ केला का? आम्ही विचारल्यावर सांगतात फंड नाही पैसे नाही गटार साफ करायला पैसे नाहीत पण लोकांना आम्हाला उत्तर द्यायला लागतात.

कुसुम गुप्ता :-

बी.पी. रोड में बहुत जादा पानी भर जाता है| इंडस्ट्री में कचरा निकाला नही जाता इसके लिए गटार जाम हो जाता है|

शानु गोहिल :-

हर साल हमको पंप लाना है तो यह विषय पहले क्यों नही लिया| पहले से प्रिपरेशन होना चाहिए|

मा. अति. आयुक्त :-

दोन विषय वेगळे आहेत. पहिला सक्शन पंपचा विषय आहे. सक्शन पंपच्या निविदा काढण्यासाठी जानेवारीमध्ये विषय दिला होता आर्थिक प्रशासकीय मंजूर पहिलीच घेतलेली आहे. इस्टीमेट तयार करुन निविदा काढली परंतु निविदेला कोणी रिस्पॉन्स देत नव्हतं कारण हे जोखमीचे काम आहे. सक्शन पंप लावत नाही बिल काढू नको चुकीचे बिल काढले आहे बिल काढायच्या टायमात आमच्याकडे पंप लावलाच नाही त्यामुळे निविदा भरायला कोण तयार होत नाही. निविदा कोणी भरत नव्हते. त्याला सांगून सांगून त्याने निविदा भरली आहे. आम्ही प्रत्येक पंपावर एक माणूस ठेवणार आहोत. त्याचा नंबर सर्व सन्मा. सदस्यांना देतो. पंप कधी सुरु झाला आणि कधी बंद झाला त्याचा चार्टच आम्ही देणार आहोत. आपल्याकडे 75 ठिकाण आहेत, 85 पंप लागतात भरती असते तेव्हा पंपाचा काही उपयोग होत नाही. आपल्या शहरामध्ये पंप लावायचीच फॅशन चालू झाली आहे. पंपाचा काही उपयोग होत नाही फक्त लोकांच्या समाधानासाठी उपयोग करतो.

मर्लिन डिसा :-

हा प्रस्ताव आज पास झाल्यावर किती दिवसांनी इम्पलीमेंट होणार?

मा. अति. आयुक्त :-

सभापतींनी त्यांना स्पष्टा इन्स्ट्रक्शन दिले आहेत पंप लावा मंजूरी देतो बऱ्याच ठिकाणी पंप लावले आहेत. 75 ठिकाणी पंप लावू तिकडच्या कॉन्ट्रॅक्टरचा नंबर सर्व सदस्यांना देतो. नाले सफाईचा विषय आहे. त्याच्या नालेसफाईचे इस्टीमेट तयार करुन सफाई करण्यात येते. 155 नाले आहेत त्याची लांबी, रुंदी, खोली किती गाळ आहे त्याप्रमाणे इस्टीमेट तयार करतात. 2008 ला 8 कोटीचे इस्टीमेट होते. 2016 ला 14 कोटीचे इस्टीमेट होते एवढा खर्च बघितला की आयुक्त बोलतात एवढी तरतूद नाही. 2-3 कोटी देतात. जर दरवर्षी 10-12 कोटी ठेवले तर चांगल्याप्रकारे साफसफाई करु शकतो असे आमचे स्पष्ट मत आहे. परंतु 10 वर्षापासून 3 कोटी फिक्स ठरलेले आहेत. आम्ही 3.25 ते 3.50 कोटीपर्यंत काम करतो जेवढे होईल तेवढे काम करतो. इस्टीमेट बघत बघत जेवढे शक्य होईल तेवढे नाले सफाईचे प्रयत्न करतो नाले सफाई समाधानकारक होत नाही हे मी स्पष्टपणे सांगतो पैसे जेवढे आहेत त्याप्रमाणे आम्ही काम करतो.

सुरेश खंडेलवाल :-

साहेब तुम्ही बोलले जेवढे पैसे मिळाले तेवढे आम्ही काम करणार. मग आम्हाला सांगा शहरात पाणी भरणार त्याची जबाबदारी आम्ही घ्यायची.

मा. अति. आयुक्त :-

जबाबदारी प्रशासनाची आहे. आपल्याला बजेट देखील बघायला लागतो. आयुक्तांना जेव्हा वाटते स्टॅन्डिंग 10 कोटीचा बजेट करते. आयुक्त त्यांच्याप्रमाणे बजेटचा उपयोग करतात किंवा नाही करतात ते मला सांगा. आयुक्तांना हे अधिकार आहे किंवा नाही शहराच्या हितासाठी कुठे पाणी भरणार शहर पाण्यामध्ये बुडणार किंवा आरोग्याचे किती माणस लागणार तो आयुक्तांचा अधिकार आहे. आयुक्त आजपर्यंत त्यांचा अधिकार वापरत आले ना. स्टॅन्डिंग महासभेचा विषय राहिलाच नाही. आमचा विषय असा आहे बाकीचे काय करायचे ते करा. ह्यावर्षी शहर जे पाण्याखाली बुडणार अजून नालेसफाई झाली नाही. अजून गटार सफाई चालू आहे.

मा. उपायुक्त :-

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो सक्शन पंपासाठी एकूण 75 लाख रुपयाचे टेंडर आहे. सक्शन पंप आपण लोकांच्या समाधानासाठी आहे. हे आपल्या चर्चाजोगी आले आहे. आपण पंपाची उपलब्धता करुन देऊ. नाले सफाईच्या बाबतीत आपण जे आक्षेप घेता परंतु दरवर्षी पेक्षा चांगली नालेसफाई केली आहे.

(सभागृहात गोंधळ)

मा. उपायुक्त :-

पानपट्टे साहेबांनी सांगितले की आपल्याला 15 कोटीचे बजेट लागणार आहे आणि 15 कोटी पूर्ण वापरुन जरी आपण नालेसफाई केली तरीही शहरामध्ये पाणी घुसणार नाही ह्याची गॅरेन्टी आपण देऊ शकत नाही. कारण वर्षानुवर्ष नाले अरुंद केले आहेत. पाणी जे नॅचरल वाहून जाते त्याचे प्रवाहच बंद केले आहेत. त्यामुळे कितीही आदळ आपट केली तरी शहरामध्ये भरती येईल तेव्हा पाणी 100 टक्के येणारच आहे. ओहोटी आल्यावर आपोआप पाणी जाईल आणि ओहोटी असेल आणि शहरामध्ये पाणी साचत असेल तर त्याची जबाबदारी आम्ही घेतो.

सुरेश खंडेलवाल :-

पवार साहेब काय बोलले नालेसफाई केली तरी पाणी भरणारच आहे. 75 लाखाचे पंप फुकटमध्ये लावतो. इंटरनल गटारची साफसफाई सफाई कामगारांनी केली आहे. 2-2 दिवस वॉर्डमध्ये झाडू लावला नाही. पानपट्टे साहेबांना फोन केला ते बोलले झाडू बाजूला सोडा इंटरनल गटार साफ करा. इंटरनल गटार त्यांना दर महिन्याला साफ करायचे आहे पण ते महिन्याला न करता वर्षातून एकदा करतात. फ्लाय ओव्हरचा नाला साफ झाला का लोकांची मेन्टेलीटी असते पंप लावल्यावर पाणी जातो. ते लोक नगरसेवकांना सांगतात ह्यावर्षी आमचे हे गटार साफ झाले नाही. तुम्ही आम्हाला सांगता बजेट संपला त्यामुळे गटार साफ झाले नाही. आम्ही लोकांना हे सांगू शकत नाही. मी 15 वर्षात कधी बोललो नाही. परंतु ह्या वर्षी मी भोगले आहे. उडवाउडवीची उत्तर आहेत. माझ्याबरोबर चला मी तुम्हाला इंटरनल गटार दाखवतो. नगरभवनच्या समोरचे गटार आता साफ करायला चालू केले आहे. त्याचा पण मी किती पाठपूरावा केला. इतर बाबतीत पावर आहेत तसेच 5-25 लाख जास्त घ्या पण गटार साफ करा.

रिटा शाह :-

मा. सभापतींच्या परवानगीने, हमारे वॉर्ड शांती विहार की बात कही पवार साहब आए और ढोले साहब भी उस दिन आए थे जो नाला साफ किया उसका कचरा बाहर पडा है वो ऐसा ही पडा है| पहली बारीश आयी तब वो अंदर चला गया आप व्हिजीट किया तब आप बोले यह कचरा निकलना चाहिए आज तक निकला नही| एस.आय. लोगो को सवाल पूछो| सेक्टर 9 में कल पहले बारीश में पानी भरा मैंने पूछा तो बोलते है सफाई हो गई है मैंने बोला रजिस्टर लाओ किसने साईन किया|

मर्लिन डिसा :-

पहले बारीश में यह हाल है|

रिटा शाह :-

हर जगह नाला खूला पडा है काम चालू है|

(सभागृहात गोंधळ)

मनोज दुबे :-

आधा नाला साफ किया है और आधा नाला बाकी है मुख्य नाला है उसको करो|

मा. सभापती :-

हर साल मे महिने में मंजुरी लेते है इस बार एप्रिल में मंजूरी दिया तो काम पूरा हो जाना चाहिए था| अभी तक उनका पेंडींग है| वेस्ट का कल्वर्ट है उसके अंदर किसकी गलती है मालूम नही उसमें जो स्लॅब था वो निचे गिर गया वो अभी भी अंदर गिरा है| वो बांधकाम विभाग निकालेगा, आरोग्य विभाग निकालेगा वो मुझे समझ नही आ रहा है|

सुरेश खंडेलवाल :-

हम जब एस.आय. को फोन करते है तो बोलते है की दिल्ली की टीम आयी है उनके साथ है| मैं बोला पहले गटर साफ करो|

मा. सभापती :-

शहर का जो जरुरी चीज है सब खर्चा करते हो तो आप बोलते है बजेट नही है लेकिन हरसाल इतने ही बजेट में हम काम करते है और साफसफाई अच्छी भी होती है| पानपट्टे साहेब आप बोलते है पंप का कुछ फरक नही पडता है मेरा खुदका एक्सपिरियन्स है मेरे वॉर्ड में जब पंप लगाता हूँ 5-6 गल्ली का पानी एक ही गटार से जाता है उसमें ऐसा है जो गल्ली का पानी पहले निकल गया है उधर का ही पानी निकलता है और बाकी वैसे ही रहता है|

(सभागृहात गोंधळ)

सुरेश खंडेलवाल :-

शुक्रवारी मिटींग आहे तेव्हा एस.आय. कडून सर्व रिपोर्ट मागवून घ्या.

मा. अति. आयुक्त :-

रिपोर्ट कशाला फोटो मागवतो.

जयंतीलाल पाटील :-

पानपट्टे साहेब, पवार साहेब आणि खांबित साहेबांचे त्यांनी पाऊस पडायच्या अगोदर मशिन बसवल्या म्हणून धन्यवाद. इलेक्ट्रीक पंप आणि डिझेल पंप किती आहेत. गेल्यावर्षी माझ्या एरियामध्ये डिझेल पंप लावलेल्या माझ्या सोसायटीने 50 ते 100 लीटर डिझेल आणले. ते पंप चालू करायचे काम आणि डिझेल कोणाचे असते.

मा. अति. आयुक्त :-

ठेकेदाराचे असते.

जयंतीलाल पाटील :-

मला ठेकेदार बोलला आम्ही पंप देणार डिझेल आम्ही आणणार नाही.

मा. अति. आयुक्त :-

टोटली फ्री ऑफ कॉस्ट आहे.

जयंतीलाल पाटील :-

माझी इंडस्ट्री एरिया आहे. काशी नगरचा पाणी जमतो. आम्हाला 35000 लोकांना जवाब द्यायचा आहे. तुम्हाला फक्त 100 नगरसेवकांना. आम्हाला हिशोबाच्या बाहेर शिव्या पडतात. तुमचे अधिकारी टायमावर पोहोचत नाही पंपवाले येत नाही. पंप बंद पडतात त्याच्यावर कोणाचे लक्ष नसते. अधिकाऱ्यांना फोन केला की अधिकारी सांगतात ठेका दिला आहे ठेकेवाले येतील.

मा. अति. आयुक्त :-

आता ह्यावर्षी प्रत्येक पंपाच्या ठिकाणी एक ऑपरेटर ठेवणार.

जयंतीलाल पाटील :-

माझ्या मागच्या साईडला एक मोठा नाला आहे तो अजून साफ झाला नाही. तिथे मी दरवाजा बसवला आहे. तो नाला अजून साफ झाला नाही. ह्यावर्षी तेथे पाणी साचला तर त्याला जबाबदार कोण असणार प्रशासन की नगरसेवक असणार आहेत.

मा. अति. आयुक्त :-

प्रशासन असणार. हेवी रेन झाला तर आम्ही काहीच करु शकत नाही.

(सभागृहात गोंधळ)

मा. अति. आयुक्त :-

पाऊस थांबल्यानंतर अर्धा तासात पाण्याचा निचरा झाला नाही तर नक्कीच नालेसफाई झाली नाही.

मर्लिन डिसा :-

इथे डांबर, इथे कॉंक्रीट, इथे टाईल्य शहरात माती कुठे आहे. पाणी जिरणार कुठे.

मनोज दुबे :-

रेल्वे समांतर नाला है उधर 75 टक्के सफाई बाकी है|

सुरेश खंडेलवाल :-

आपत्ती व्यवस्थापनाचे नंबर जे सर्क्युलेट केले आहेत तिकडे कोण बसणार आहे.

रिटा शाह :-

हमारे उधर बंद है|

मा. अति. आयुक्त :-

उद्या मिटींग बोलवतो आणि त्याच्यात सुचना देतो.

मनोज दुबे :-

नंबर जो डाला है वो बंद है|

सुरेश खंडेलवाल :-

आपत्ती व्यवस्थापन म्हणजे रात्री 2 वाजता जरी फोन केला तर तिथे फोन उचलला गेला पाहिजे तिथे माणस असली पाहिजे. माझे मत 5-50 घ्या पण आपत्ती व्यवस्थापनमध्ये माणस ठेवा दोन शिपमध्ये माणस ठेवा.

मर्लिन डिसा :-

पवार साहेब बोलले नाल्याचे एन्क्रोचमेंट झालेले आहे तर बिल्डर लोकांवर काय कारवाई केली.

मा. उपायुक्त :-

ते माझ्याकडे नाही.

मर्लिन डिसा :-

ते विचारायला पाहिजे आयुक्तांना रिपोर्टींग करा.

मा. उपायुक्त :-

मॅडम ते आजचे नाही.

मर्लिन डिसा :-

जेव्हा पण असू द्या ते मला माहित आहे.

सुरेश खंडेलवाल :-

साहेब आम्ही आजपर्यंत नाल्यामध्ये किती गाळ आहे आणि किती काढला आहे ते चेक केले नाही पण लोकांची मेन्टेलीटी असते. आमच्या बिल्डींगच्या समोरचे गटार साफ झाले नाही तुम्ही 5-5 मिनिट जरी फावडे लावले तरी त्यांचे समाधान होते.

जयेश भोईर :-

ह्यापैकी उपायुक्त पवार साहेबांचे अभिनंदन करतो आमच्या गावातून जी खाडी जाते ती मोठ्या प्रमाणात साफ केली आहे.

मा. सभापती :-

साफसफाई टेंडर का महासभा में मंजूरी दिया|

सुरेश खंडेलवाल :-

यह टेंडर कभी खतम हुआ|

मा. अति. आयुक्त :-

2017 में|

सुरेश खंडेलवाल :-

5 साल में शहर इतना बढ गया उसी लेबर के उपर शहर में काम चल रहा है| सारे टेंडर हो जाते है लेकिन 5 साल से कचरे का टेंडर नही हुआ सुबह निकलते हो तो गंदगी सब जगह गंदगी है|

मा. सभापती :-

इसके लिए स्पेशल मिटींग लेना पडेगा|

अशरफ शेख :-

आमच्या नयानगरमध्ये पाणी भरत नाही कारण का भरत नाही आम्ही नाले चौडे केले आणि कलवर्ट करुन घेतले.

**प्रकरण क्र. 41 :-**

मनपा क्षेत्रात पावसाळ्या दरम्यान सखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा कामी भाड्याने 10 BHP ते 19 BHP HP क्षमतेचे सक्शन पंप पुरवठा कामाच्या निविदेतील दरास मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. 36 :-**

निविदेतील प्राप्त दरामध्ये वाटाघाटी अंती मान्य केलेल्या दराचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| **Sr. No.** | **Type of Suction Pump** | **मे. गणेश डेव्हलपर्स यांनी सादर केलेले दर** | **मे. विंध्या ट्रेडर्स यांनी सादर केलेले दर** | **मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी सादर केलेले दर** | **L1 निविदाधारक मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Dewatering on BHP by using water pump including diversion of stream, providing cofferdams, earthern bunds etc. as may be necessary for foundation and other parts of the works and pumping out water during and after excavation as may be required by using 10 to 19 BHP | Rs. 410.00 Per Hour | Rs. 504.00 Per Hour | **Rs. 345.00 Per Hour** | **Rs. 340.00 Per Hour** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | pump etc. complete. | | | | |
| 2 | Providing Labour including required safety precaution | Rs. 165.00 Per Hour | Rs. 175.00 Per Hour | **Rs. 150.00 Per Hour** | **Rs. 140.00 Per Hour** |
| | **Total** | **Rs. 575.00 Per Hour** | **Rs. 679.00 Per Hour** | **Rs. 495.00 Per Hour** | **Rs. 480.00 Per Hour** |

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार पावसाळ्या दरम्यान सखल /अतिसखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी 10 BHP ते 19 BHP क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने पुरवठा करणे कामी मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांची वाटाघाटी अंती मान्य केलेल्या दराची निविदा स्विकारून रू. 75 लाख पर्यंतच्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल** **अनुमोदक :- श्रीम. सुनिता जैन**

**ठराव सर्वानुमते मंजूर**


**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मा. सभापती :-

सभा संपली असे जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- सायं.** 4.00 **वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**



(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका